# २१.

# आय. टी. हब, पशुसंवर्धन आयुक्तालय, म. रा., गोरवलेनगर, पुणे.

पशुसंवर्धन माहिती पुस्तिका

# २१. आय. टी. हब पशुसंवर्धन आयुक्त कार्यालय, गोखलेनगर, पुणे

१. पशुसंवर्धन विभागाचा आय. टी. हब आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयांतर्गत पशुरोग अन्वेषण विभाग, पुणे येथे दिनांक ३/११/२००९ रोजी कार्यान्वीत करण्यात आला. सदर हब दिनांक १६/८/२०१० रोजी गोखलेनगर येथे स्थलांतरीत करण्यात आला.

२. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१००९/प्रक्र १/आयटी सेल; दिनांक ३० सप्टेंबर २००९ नुसार मे. नेलीटो सिस्टमस् यांचेमार्फत गोखलेनगर, पुणे येथे आयुक्त कार्यालयासाठीचा माहिती व तंत्रज्ञान कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षासाठी मे. नेलीटो सिस्ट्मस यांनी तीन प्रोग्रॅमर व तीन डाटा एन्ट्री ऑपरेटर उपलब्ध करून दिलेले आहेत. या कक्षामार्फत पशुसंवर्धन खात्याच्या तांत्रीक, प्रशासकीय तसेच आर्थीक माहितीचे ऑनलाईन संकलन करण्यात येत आहे. यासाठी आवश्यक सॉफटवेअर आय. टी. हब येथेच निर्माण केलेले आहे. सध्या तांत्रीक महत्वाच्या बाबींची माहिती ऑनलाईन संकलित करण्यात येत असून प्रशासकीय तसेच आर्थीक माहितीचे ऑनलाईन संकलन करण्यासाठी सॉफटवेअर निर्माण करण्याचे काम चालू आहे. सांसर्गिक रोगांचा प्रादुर्भाव याबाबतची तांत्रीक माहिती ऑनलाईन संकलनामुळे योग्य वेळी योग्य ठिकाणी लसीकरण करणे व रोग आटोक्यात आणणे तसेच सर्व योजनांची माहिती शासनाला वेळेत सादर करण्यात येते. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत सुलभता आली आहे.

३. पशुसंवर्धन खात्यामधील विविध विभागांचे संगणकीरण करतांना प्रथम प्राधान्याने आयुक्त पसं कार्यालतील नियोजन व अंदाज कार्यासन, रोग नियंत्रण कार्यासन, कुक्कूट कार्यासन, सहाय्यक संचालक (लेखा) याचेकडील तीन कार्यासणांच्या माहीतीचे संगणकीकरण, त्यानंतर एकात्मिक पाहणी योजनेच्या अहवालांचे संगणकीकरण, संख्यिकी विभागातील माहितीचे संगणकीकरण, पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेकडे लस मागणी प्रक्रीयेचे संगणकीकरण करण्यात येणार आहे.

४. खालील महत्वाची माहिती संकेतस्थळावर (http://ah.adfmaharashtra.in) उपलब्ध आहे.

1. Milk, Egg, Wool, Meat production and Livestock and Poultry Keeping Practices in Maharashtra State for the years 2001-02, 2002-03, 2003-04, 2004-05, 2005-06 and 2006-07
2. Performance Budget 2008-09 and 2009-10
3. Virtual Copy of the web site of Commissioner Animal Husbandry (http://mahavet.mah.nic.in)
4. Performance of technical parameter (Graphical representation)
5. Ranking of veterinary institutes by taking into consideration AI & calf born. (Login required).

५. सदर संकेत स्थळ डायनॅमिक करण्यासाठी फेज-१ अंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ते पदुम दरम्यान माहिती मार्गाचे नियोजन करण्याच्या सूचना तत्कालीन सचिव (पदुम) यांनी दिल्या होत्या. त्या अनुषंगाने प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त सर्व, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त सर्व, तालूका पातळी, सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना युझर नेम व पासवर्ड देण्यात आले आहेत.

६. या अंतर्गत एम.आय.एस. साठी संख्यिकी विभागाचा तांत्रिक बाबींचा मा. प्रा. अहवाल, नियोजन व अंदाज कार्यासन, रोग नियंत्रण कार्यासन, कुक्कुट कार्यासन, रोग अन्वेषण विभाग, विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा यांचेकडील विविध अहवालांचे एम.आय.एस. प्रोग्रामिंग पूर्ण झाले असून या अहवालांमध्ये क्षेत्रीय स्तरावरून डाटा एंट्रीची प्रत्यक्षात सुरवात झाली आहे. Reconsilation अहवालांची चाचणी झाली आहे.

७. शासकीय कामकाजात युनिकोडचा वापर करण्याचे महाराष्ट्र शासनाचे धोरण असल्यामुळे सदर संकेतस्थळावरील मराठी माहितीसाठी युनीकोडचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे मराठी माहिती कुठल्याही संगणकावर (मराठी फॉन्ट उपलब्ध नसेल तरीही) वाचनीय स्वरूपात उपलब्ध होते.

८. सदर संकेतस्थळ दृष्टीदोष असणाऱ्या, निरक्षर व्यक्तींना समजण्यायोग्य करण्यासाठी विविध पर्यायांचा वापर करण्यात आला आहे. (Barrier Breaking). यामुळे क्षीण दृष्टी असणाऱ्या, रातआंधळेपणाने ग्रस्त असणाऱ्या व्यक्तीदेखील या संकेतस्थळाचा वापर करू शकतात. तसेच दृष्टीहीन व्यक्तींना सदर संकेतस्थळ विंडोज रीडर/जॉज प्रणालींचा वापर करून वाचता येते.

९. शासननिर्णय व आलेल्या निविदा संकेतस्थळावर अपलोड करण्याची सुविधा आहे. डाटाएन्ट्री व महत्वाचे डॉक्युमेंटस् स्कॅन करून संकेतस्थळावर वेळोवेळी अपलोड करण्यात येतात. तसेच ऐनवेळेवर आलेले फॉर्मस् उदा. मंत्रालयाकडून आलेले कोर्ट केसेसचे फॉर्म तयार झालेले आहेत. व्हिलेजवाईज फॉर्म तयार होऊन त्याची डाटाएन्ट्री दरमहा सुरू झालेली आहे. आतापर्यंत आलेल्या एकूण २११ एम.आय.एस फॉर्म पैकी ११४ फॉर्मची डाटाएन्ट्री क्षेत्रियस्तरावरून सुरू झालेली आहे.

♦♦♦